# प्रेसनोट

जा.क्र.-पोउप-आ/वाहतूक/६७९८ /२०१९ पुणे शहर, दिनांक २२.०७.२०१९

**विषय :- वाहतूक शाखेतील कर्मचारी यांना रेनकोटचे वाटप केले बाबत.**

--------------००-----------

वाहतूक शाखा पुणे शहर कडील वाहतुक नियमन करणारे कर्मचारी यांना, पाऊसाळ्यात शहरामध्ये चौका-चौकात पाऊस चालू असतानाही निरंतर वाहतुक नियमनाचे कर्तव्य करावे लागते, त्यावेळी पाऊस, वाहनांमुळे अंगावर उडणारा चिखल यापासून कर्मचारी यांना संरक्षण होण्याकरीता, सामाजिक कर्तव्याचे भावनेतून कोलते पाटील डेव्हलपर्स लि. तर्फे १३०० रेनकोट भेट दिले आहेत.

सदर रेनकोटचे आज दिनांक- २२/०७/२०१९ रोजी, पोलीस उप आयुक्त,वाहतुक शांखा कार्यालय पुणे येथे मा.पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पुणे शहर श्री. पंकज देशमुख यांच्या व कोलते पाटील डेव्हलपर्स लि. चे कार्यकारी संचालक श्री मिलींद कोलते, सहाय्यक उपाध्यक्ष(मार्केटींग) श्रीमती गायत्री कुंटे यांचे हस्ते वाहतुक शाखेकडील कर्मचारी यांना वाटपाचा कार्यक्रम संपन्न झाला आहे.

सदर कार्यक्रमास पोलीस उप आयुक्त,वाहतुक श्री.पंकज देशमुख, कोलते पाटील डेव्हलपर्स लि. कार्यकारी संचालक श्री मिलींद कोलते,सहाय्यक उपाध्यक्ष(मार्केटींग) श्रीमती गायत्री कुंटे, श्री. धिरेंद्र सेंगर, पोलीस निरीक्षक(प्रशासन) ब्रम्हानंद नाईकवाडी, महिला पोलीस हवालदार श्रीमती वर्षा ॲन्थोनी व वाहतुक शाखेकडील कर्मचारी उपस्थित होते.